**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, AUG-SEPT, 2022, VOL-10/53
https://doi.org/10.21922/srjhsel.v10i53.11639

# शिक्षक व्यवसायिक सचोटी अभ्यास

**प्रा. प्रकाश जगताप, Ph. D.**

*टिळक शिक्षण महाविधालय पुणे*

**Paper Received On:** 25 SEPTEMBER 2022

**Peer Reviewed On:** 30 SEPTEMBER 2022

**Published On:** 1 OCTOBER 2022

***Abstract***

*शिक्षक हा समाजातील आणि राष्ट्र विकासातील एक महत्वाचा घटक आहे.म्हणून शिक्षक प्रमाणिक,इमानदार असणे आवश्यक आहे. आपल्या व्यवसाया विषयी ,पेशा विषयी उत्तरदायित्व ,बांधिलकी पार पाडणारे व्यक्तिमत्व शिक्षकाचे असावे.प्रस्तुत संशोधन लेखात शिक्षकाचे व्यवसायिक सचोटी ची सद्य स्थिती ,ग्रामीण व शहरी व शिक्षक शिक्षिका यांच्या व्यवसायिक सचोटीचा सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करून शोध घेऊन निष्कर्ष काढले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

अध्यापन म्हणजे शिक्षकी पेशा हा एक उदात्त व्यवसाय आहे. आणि तो समाजाच्या विकासासाठी जबाबदार आहे विद्यार्थ्यामध्ये वर्तनात्मक बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण देणे आणि इच्छित ज्ञान प्रदान करणे ,विधार्थ्यांचा सर्वागीण विकास घडवून आणणे ,समाज विकासात महत्वपुंर्ण भूमिका निभावणे , समाजाप्रती दायित्व यावर त्याचा प्रभाव पडतो समाजातील सर्वात आदराचे स्थान शिक्षकाचे आहे प्राचीन काळी निश्चित वय झाल्यावर मुलाला शिक्षणासाठी गुरुकुल नावाच्या गुरूगृहात पाठवले जात होते गुरुकुलमध्ये सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक दिली जात होती आणि त्यांना समान शिक्षण दिले जात होत त्या बदल्यात विद्यार्थी गुरूला दैनंदिन घरगुती कामात मदत करत आर्थिक दृष्टीने कोणतेही उत्पन्न किंवा शुल्क नव्हते विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामधील नात्यात खूप आदर होता शिक्षणाच्या या काळात शिक्षकाकडून विद्यार्थ्याने सामाजिक व नैतिक मूल्ये आत्मसात कली शिक्षकाने विद्यार्थ्याचे चांगल्या -माणसात परिवर्तन केले

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

परंतु आधुनिकीकरण आणि डिजिटलायझेशनच्या युगात अध्यापनाच्या व्यवसायाच व्यापारीकरण होत असून समाजाच्या कल्याणासाठी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर कमी भर पडत आहे हे शिक्षकांच्या नैतिक मूल्यांमध्ये हस्तक्षप करत आहे आणि त्यांना अनेकदा अनिच्छन किवा नकळत चुकीच्या पद्धतीच पालन करण्यास वश करत आहेत विद्यार्थ्यांचे बरेचसे शिक्षण वर्गातील अध्यापनात मिळते अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षकांची महत्त्वाची भूमिका महत्वाची असते एखाद्याच्या नैतिक विचार आणि कृतीमध्ये कोणताही फरक होणार नाही याची खात्री करण्यासाठी प्रत्येक शिक्षक जबाबदार असतो , चाणक्याच्या नीतीचा संदर्भ देत शिक्षक कभी साधारण नहीं होता प्रलय और निर्माण उसकी गोद में पलता है।" शिक्षकांच्या कृतीचा विद्यार्थ्यांवर जोरदार परिणाम होत असल्याने व्यवसाय प्रभावीपण पार पाडण्यासाठी तत्त्व आणि चांगल्या पद्धतींचा परिचय करून देण्याची गरज बनली आहे.

शिक्षक काटेकोरपणे शिकत असतो आणि शिकण्याचा प्रचंड अनुभव घेऊन येतो या अनुभवाचा उपयोग शिक्षकाचे मनोबल आणि व्यवसायासाठी प्रेरणा विकसित करण्यासाठी धोरण तयार करण्यासाठी केला जाऊ शकते तसेच सध्याच्या शिकवण्याच्या पद्धतीमध्ये नवीन कल्पना रुजवल्याने शिक्षकांची कार्यक्षमता वृन्धिगत होऊन अध्यापन पद्धती बळकट करून त्यांची अंमलबजावणी केल्यास शिक्षकामध्ये एकरूपता येऊ शकते तथापि, अध्यापनाचा मुख्य उद्देश साध्य करण्याच्या दिशेने सर्व शिक्षकांना नैतिकदृष्ट्या संरेखित करण हे तव्हाच समजू शकते जेव्हा शिक्षक योग्य आणि चुकीचा फरक करण्यास सक्षम असतात.

## शिक्षक व्यवसायिक सचोटी

शिक्षकाची व्यवसायिक सचोटी समाजाने अध्ययनाथ्यांना समाज आणि अध्ययनार्थी यांना अध्यापन व्यवसायाचे महत्त्व पटवून देणारा आणि समाजामध्ये एक प्रामाणिक व्यवसाय म्हणून ओळख करून देणारा शिक्षक प्रामाणिक असतो सचोटीने आपला व्यवसाय करतो शिक्षकाला वर्ग, शालेय स्तर, संस्थांतर्गत कार्य, शालाबाह्य कार्यक्रम, पालकांबद्दल समाजाबाबत सचोटी या सर्वांसोबत प्रामाणिकपणे कार्य करावे लागते. यावरून शिक्षकाची व्यवसायिक सचोटी सिद्ध होते.

शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी तीन बाबी आवश्यक आहेत. क्षमता competencies, बांधिलकी commitments,सचोटी Integrity

## संशोधनाची गरज

शिक्षकामधील व्यावसायिक सचोटी आणि आचारसंहितेचे पालन करण्याची दृष्टीने यामुळे या संशोधनाचे उद्दिष्ट अधिक बळकट झाले आहे. शिक्षकांमध्ये शिक्षणाचा अर्थ आणि अध्यापन हा व्यवसाय म्हणून योग्य असण्याबाबत जागरुकता निर्माण करणे अत्यंत निकडीचे आणि महत्त्वाचे झाले आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

शिक्षकांच्या कृतीचा परिणाम विद्यार्थ्यांवर जास्त होत असल्याने व्यवसाय प्रभावीपणे पार पाडण्यासाठी परिभाषित तत्त्वे आणि चांगल्या पद्धतीचा परिचय करून देण्याची गरज आहे.शिक्षकांमधील व्यवसायिक सचोटी जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

**समस्या विधान** –शालेय शिक्षकांच्या व्यावसायिक सचोटी चा अभ्यास करणे.

**कार्यात्मक व्याख्या**

**शालेय शिक्षक**- इयत्ता पाचवी ते दहावी च्या वर्गांना अध्यापनाचे कार्य करणारे शिक्षक,

**व्यावसायिकसचोटी**-शिक्षकाचे व्यवसायाबद्दल असलेला इमानदारपणा , खरेपणा, चोखपणा, प्रामाणिकपणा,अखंडत्व, साकल्य या बाबी अंतर्भूत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. शालेय शिक्षकाच्या व्यावसायिक सचोटीचा शोध घेणे.

२.शालेय शिक्षकाच्या व्यावसायिक सचोटीची लिंगभाव व शाळेचे स्थान या प्रमाणे तुलना करणे

**संशोधन पद्धती**-प्रस्तुत संशोधनात शिक्षकांच्या व्यावसायिक सचोटी ची सध्यस्थिती जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धती चा वापर केला.

**जनसंख्या** –प्रस्तुत संशोधनासाठी पुणे शहरातील शालेय शिक्षक हि जनसंख्या आहे.

न्यादर्श- प्रस्तुत संशोधनासाठी १०१ शिक्षक असंभाव्ये पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवडले होते.

**माहिती संकलन साधन** –प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली चा वापर केला आहे.

**माहितीचे विश्लेषण** –

शून्य परिकल्पना – ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक शिक्षकांच्या शिक्षक शिक्षक व्यावसायिक सचोटी प्रश्नावली मध्यमानामध्ये कोणताही सार्थ फरक आढळत नाही.

सदर शून्य परिकल्पना तपासण्यासाठी ग्रामीण व शहरी भागातील शिक्षकांना शिक्षक व्यावसायिक सचोटी प्रश्नावली मिळालेल्या प्राप्तांकांचे मध्यमान, प्रमाणविचलन काढण्यात आले. तसेच टी परीक्षिकेच्या मदतीने दोन्ही मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्यात आली.

| शिक्षक | नमुना संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मूल्य | शून्य परिकल्पना |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण भागातील शिक्षक | 31 | 287.25 | 29.99 | 1.29 | स्वीकार |
| शहरी भागातील शिक्षक | 70 | 297.45 | 32.54 | | |

*८कोष्टकातील टी मूल्य . 0.05 सार्थकता स्तर . 1.98 (स्वाधीनता मात्रा 100)*

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

कोष्टक वरून असे दिसून येते की, ग्रामीण भागातील शिक्षक व शहरी भागातील शिक्षकांच्या **शिक्षक व्यावसायिक सचोटी प्रश्नावली** मध्ये मिळालेल्या प्राप्तांकाची तुलना केली असता, येणारे टी मूल्य १.२९ इतके आहे. 0.05 या सार्थकता स्तरावर कोष्टक टी मूल्य १.९८ इतके आहे. गणन केलेले टी मूल्य हे कोष्टक टी मूल्यापेक्षा जास्त असल्याने शून्य परिकल्पना चा त्याग करण्यात आला. म्हणजेच ग्रामीण भागातील शिक्षक व शहरी भागातील शिक्षकांच्या **शिक्षक व्यावसायिक सचोटी** मध्ये सार्थ फरक दिसून येतो. यावरून शहरी भागातील शिक्षकांची **शिक्षक व्यावसायिक सचोटी** ग्रामीण भागातील शिक्षकांच्या **शिक्षक व्यावसायिक सचोटी** पेक्षा अधिक आहे.

शून्य परिकल्पना – शिक्षक व शिक्षिकांच्या **शिक्षक व्यावसायिक सचोटी प्रश्नावली** प्राप्तांकाच्या मध्यमानामध्ये कोणताही सार्थ फरक आढळत नाही. सदर शून्य परिकल्पना तपासण्यासाठी शिक्षक आणि शिक्षिकांना शिक्षक **व्यावसायिक सचोटी** शलाकेमध्ये मिळालेल्या प्राप्तांकांचे मध्यमान, प्रमाणविचलन काढण्यात आले. तसेच टी परीक्षिकेच्या मदतीने दोन्ही मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्यात आली.

| **नमुना** | **नमुना संख्या** | **मध्यमान** | **प्रमाणविचलन** | **टी मूल्य (गणन केलेले)** | **शून्य परिकल्पना स्वीकार/त्याग** |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षक | **39** | 277.09 | 29.17 | 0.44 | स्वीकार |
| शिक्षिका | **62** | 297.29 | 32.19 | | |

*८कोष्टकातील टी मूल्य . 0.05 सार्थकता स्तर . 1.98 (स्वाधीनता मात्रा 100)*

कोष्टक वरून असे दिसून येते की, शिक्षक आणि शिक्षिका यांना **शिक्षक व्यावसायिक सचोटी प्रश्नावली** मिळालेल्या प्राप्तांकाची तुलना केली असता, येणारे टी मूल्य 0.४4 इतके आहे. 0.05 या सार्थकता स्तरावर कोष्टक टी मूल्य 1.9८ इतके आहे. गणन केलेले टी मूल्य हे कोष्टक टी मूल्यापेक्षा कमी असल्याने शून्य परिकल्पना चा स्वीकार करण्यात आला. म्हणजेच शिक्षक आणि शिक्षिका यांच्या **व्यावसायिक सचोटी** मध्ये सार्थ फरक नाही. यावरून शिक्षक आणि शिक्षिकांची **शिक्षक व्यावसायिक सचोटी** सारखीच आहे.

**निष्कर्ष**

पुणे जिल्हयातील शिक्षकांची व्यावसायिक सचोटी चांगली आहे

पुणे जिल्ह्यातील अनुदानील शाळेतील शिक्षकांची व्यावसायिक सचोटी चांगली आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

पुणे जिल्ह्यातील शहरी भागातील शिक्षकांची व्यावसायिक सचोटी चांगली आहे.

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिक्षकांची व्यावसायिक सचोटी चांगली आहे.

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी आणि अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांची व्यावसायिक सचोटी मध्ये लक्षणीय फरक नाही.

## संदर्भ

*पंडित बी., पाटील ना., मोरे ल. (2009) शिक्षक शिक्षण, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स,*

*पंडित ब.,सपकाळे आ.,मोरा ल., (2006) भारतातील शिक्षण व्यवस्थेचा विकास, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स,*

*पवार ना., (2007) भारतातील शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह,पुणे, नित्यनूतन प्रकाशन*

*पारसनिस न., (2009) शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका,पुणे, नित्यनूतन प्रकाशन,*

***घोरमोडे के यु घोरमोडे क ;२००९द्ध शिक्षकांचे शिक्षणए नागपूरए विदया प्रकाशन १० जगताप हण ;२००६द्ध***

*मूळे रा., उमाठे वि. (1998) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर,महाराष्ट विदयापीठ ग्रंथ निर्मिती*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*